**अर्ज** दिनांक / /२०२०

**प्रति,**

**मा. कार्यकारी अधिकारीसो.**
**श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,**
**पंढरपूर, जि. सोलापूर.**

**विषय :—** **''सराफ''** या मानधन तत्वावरील पदाचे नियुक्तीसाठी अर्ज.

**संदर्भ :—** दि.१६/०१/२०२० रोजीच्या दै.संचार, सोलापूर या वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेली जाहिरात.

**महोदय,**

कारणे विनंती अर्ज करतो/करते की, संदर्भात नमुद जाहिरातीला अनुसरून मी **सराफ** या पदासाठी अर्ज करीत आहे. मी श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरात काम करण्यास इच्छूक आहे. माझी वैयक्तीक माहिती खालीलप्रमाणे आहे.

(१) पुर्ण नाव ———————————————————

(२) पूर्ण पत्ता ———————————————————

———————————————————

(३) मोबाईल क्रमांक ———————————————————

(४) जन्मतारीख व वय दि. / /१९ वय : —— वर्षे

(५) शैक्षणिक पात्रता ———————————————————

(६) कामाचा अनुभव ———————————————————

(७) प्रतिमहा मानधनाची अपेक्षा ———————————————————

वरीलप्रमाणे माझी सर्व माहिती खरी व बरोबर आहे. सदर नियुक्तीबाबतच्या जाहिरातीतील आणि अर्जासोबतच्या अटी व शर्ती मी वाचलेल्या असून त्या मला मान्य आहेत. सदर कामाचा मला पुरेसा अनुभव असल्याने माझ्या अर्जाचा सहानूभूतीपूर्वक विचार करून मला सेवा करण्याची संधी द्यावी ही विनंती.

**आपला विश्वासू,**

**(पूर्ण नांव व स्वाक्षरी)**

**सोबत खालील कागदपत्राच्या सत्यप्रती जोडल्या आहेत.**

(१) शैक्षणिक प्रमाणपत्रे (२) अनुभव प्रमाणपत्रे.
(३) ओळखपत्र (आधारकार्ड/मतदानकार्ड/पॅनकार्ड/वाहन चालक परवाना)
(४) सोने चांदी मुल्याकंन करण्याबाबत अधिकृत सराफ असल्याचे शासकीय प्रमाणपत्र.
(५) कोणताही गुन्हा दाखल नसलेबाबत संबंधीत पोलीस स्टेशनचा दाखला.

## श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर
## भरतीचे अटी व शर्ती (जाहिरात दि.१६/०१/२०२०).

१. विहित नमुन्यातील अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे दि.३०/०१/२०२० रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत कार्यालयात जमा करावीत. तद्नंतर आलेले अर्ज व अपूर्ण अर्ज ग्राहय धरले जाणार नाही. तसेच यापूर्वी सादर केलेले अर्ज रद्द करण्यात आलेले आहेत.

२. अर्जाचा नमुना, नियुक्तीच्या अटी व शर्ती मंदिर समितीच्या www.vitthalrukminimandir.org या संकेतस्थळावर व श्री. संत तुकाराम भवन येथे उपलब्ध आहेत.

३. कामाचा अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

४. सोने चांदी मुल्याकंन करण्याबाबत अधिकृत सराफ असल्याचे शासकीय प्रमाणपत्र अर्जदाराकडे असणे आवश्यक आहे. तसेच त्यांची शैक्षणिक पात्रता दहावी पास असावी. तत्सम कामाचा ५ वर्षाचा अनुभव असावा.

५. सदर पदावरील पात्र उमेदवाराची निवड मुलाखतीद्वारे करण्यात येईल.

६. सदर भरतीसाठी कोणत्याही प्रकारचे आरक्षण लागू नाही.

७. उमेदवारास मुलाखतीवेळी आवश्यक ती मुळ कागदपत्रे व त्यांच्या सांक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक राहील.

८. अर्जासोबत आपल्या नावे कोणताही गुन्हा दाखल नसलेबाबत संबंधीत पोलीस स्टेशनचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

९. सदरची नियुक्ती ११ महिन्याच्या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर करण्यात येईल. तसेच दर तीन महिन्यानी कामातील प्रगती आणि कामाची गरज विचारात घेवून नियुक्ती पुढे चालू ठेवणेबाबत विचार करण्यात येईल.

१०.११ महिने पुर्ण झालेनंतर कामातील प्रगती आणि कामाची गरज विचारात घेवून, संबंधितांकडून योग्य अटी व शर्तीचे बंधपत्र घेवून, त्यांची नियुक्ती पुढे चालू ठेवणेबाबत विचार करण्यात येईल.

११.सदर नियुक्तीद्वारे मंदिर समितीकडे कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा कोणताही अधिकार उमेदवारास राहणार नाही.

१२. सदर पदावर भरती झालेल्या उमेदवारास पंढरपूर शहरात निवास करणे आवश्यक आहे.

१३. गुणवत्ता पाहून मानधन देण्यात येईल व नियुक्तीच्या पहिल्या वर्षात मानधनामध्ये वाढ देण्यात येणार नाही. तसेच मानधना व्यतिरिक्त इतर कोणतेही लाभ अथवा भत्ते लागू होणार नाहीत.

१४. कामाची वेळ नेमून दिली जाईल त्या वेळेत काम करावे लागेल. तसेच आवश्यक भासेल तेंव्हा जादा वेळ काम करावे लागेल.

१५. काम मध्येच सोडावयाचे असल्यास तशी एक महिना अगोदर नोटीस देणे आवश्यक राहील. अचानक काम सोडता येणार नाही. अचानक काम सोडणेस एक महिन्याचे मानधन जमा करावे लागेल.

१६. कामाची प्रगती व वर्तन असमाधानकारक असल्यास तात्काळ कामावरुन कमी करण्याचा अधिकार कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांना राहील.

१७. प्रशासकीय व अन्य कारणास्तव सदरची भरती प्रक्रिया कोणत्याही स्तरावर स्थगित अथवा रद्द करण्याचा अधिकारी मंदिर समितीने राखून ठेवला आहे.

१८. निवड झाल्यास नेमणुकीच्या अटी व शर्ती मान्य असलेबाबत रु.१००/— च्या स्टॅपपेपरवर तहसीलदार यांचे समोर सादर केलेले प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

१९. कामकाजाचे स्वरूप :— समितीकडे भाविकांकडून प्राप्त झालेले देणगी / भेट स्वरूपातील सोने चांदी दागिन्यांचे / वस्तूंचे मुल्यांकन करणे.

—————XXX—————